27 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलव्यवस्थापनासाठी शिक्षक, विद्यार्थी देणार योगदान

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात जलव्यवस्थापन कृती पंधरवडा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : ''शाश्वत जलव्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी नेहमीच जलसंपदा विभागासाठी योगदान देतील,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले. जलसंपदा विभागातील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (पुणे) आणि शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) यांच्यावतीने 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५' निमित्त आयोजित संवाद व कृती कार्यक्रमात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.




कोल्हापूर : जलसंपदा विभागातील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठातील 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५' कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. शेजारी अधिकारी.

डॉ. शिर्के म्हणाले, ''जलसंपदा विभागात अनेक प्रकल्प सुरू आहेत. वेगवेगळ्या कृती आराखड्यांमधून जलव्यवस्थापनाची कामे सुरू आहेत. प्रत्यक्ष अनुभवांना शैक्षणिक व संशोधनात्मक जोड मिळाल्यास चांगला जलव्यवस्थापन कृती आराखडा तयार करता येईल.'' अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे यांनी शाश्वत जलव्यवस्थापनासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या युगात लोकाभिमुख कामे करून पारदर्शक पद्धतीने आराखड्यांची निर्मिती व अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

भूगोल विभागप्रमुख व व्याख्याते डॉ. सचिन पन्हाळकर यांनी 'भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलव्यवस्थापन' विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या डॉ. आसावरी जाधव यांनी 'शाश्वत जलव्यवस्थापना'वर भाष्य केले, तर 'नेटाफीम'चे संचालक प्रशांत पाटील यांनी ठिबक सिंचनाचे महत्त्व सांगितले. कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर यांनी मागील काळात शिवाजी विद्यापीठावरोबर केलेल्या कामांची माहिती दिली.

कार्यकारी अभियंता देवाप्पा शिंदे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची रूपरेषा मांडून जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. उपअधीक्षक अभियंता संजय पाटील, कार्यकारी अभियंता स्मिता माने, कार्यकारी अभियंता अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी व शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

27 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात निवड झालेल्या संशोधकांचा गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# संशोधकांना पाठबळासाठी विद्यापीठ तत्पर

प्रतिनिधी
कोल्हापूर

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) या देशातील आघाडीच्या संशोधन संस्थेमधील संशोधकांसमवेत काम करण्यासाठी विद्यापीठातील १८ संशोधकांची झालेली निवड कौतुकास्पद आहे. संशोधकांच्या प्रकल्पाला पाठबळ देण्यासाठी विद्यापीठ नेहमी तत्पर असेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये निवड झालेल्या संशोधकांचा आज विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के
- आयआयएससीमध्ये निवड झालेल्या संशोधकांचा सत्कार

डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या विविध विभागांतील संशोधकांनी विद्यापीठाचे नाव जगभरात उंचावले. आयआयएससीसोबत ॲडव्हान्स्ड मटेरियल सायन्सविषयक प्रकल्पावर काम करण्याची संधी आपल्या संशोधकांना मिळाली आहे. या सर्वांमुळे विद्यापीठाला लौकिक प्राप्त होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी भविष्यात विद्यापीठाचे विविध प्रणालींमधील रँकिंग उंचावण्यासह पेटंटचे व्यावसायीकरण आणि उद्योगांसमवेत काम करण्याची संधी मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

भारतीय विद्यापीठांची संशोधन व विकासाची क्षमता वाढवण्यासाठी केंद्राने स्थापित केलेल्या अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनअंतर्गत अत्यंत महत्वाकांक्षी पेअरच्या 'हब-अँड-स्पोक' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर यांच्याशी 'स्पोक' म्हणून जोडले आहे. यामध्ये विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पदार्थविज्ञान, संगणकशास्त्र, संख्याशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, गणित आणि युसिक या विभागांतील १८ संशोधक काम करणार आहेत. डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मुख्य संशोधक डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. केशव राजपुरे, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. सागर डेळेकर, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. अनिल घुले, डॉ. एस. एन. तायडे, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. जे. बी. यादव, डॉ. के. डी. पवार, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. कविता ओझा, डॉ. के. डी. कुचे, डॉ. एस. डी. पवार, डॉ. एस. एस. सुतार आणि डॉ. के. एस. खराडे यांचा गौरव करण्यात



जनसंपर्क कक्ष

2 7 APR 2025

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससमवेत 'हब अँड स्पोक' प्रकल्पांतर्गत संशोधनासाठी निवड झालेल्या विविध अधिविभागांतील संशोधकांचा शिवाजी विद्यापीठात गौरव झाला. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासमवेत सर्व संशोधक.

# संशोधनासाठी निवड झालेल्या गुणवंतांचा गौरव

कोल्हापूर, ता. २६ : 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) या देशातील आघाडीच्या संशोधन संस्थेमधील संशोधकांसमवेत काम करण्याची संधी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना लाभणार आहे, ही गौरवाची बाब आहे. भविष्यात हे संबंध अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील संशोधकांनी गांभीर्यपूर्वक कार्य करावे,' असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन (एएनआरएफए) यांच्या अंतर्गत 'पेअर'च्या 'हब-अँड-स्पोक' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूरशी 'स्पोक' म्हणून जोडले गेले. या प्रकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पदार्थ विज्ञान, संगणकशास्त्र, संख्याशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, गणित आणि युसिक विभागांतील १८ संशोधक काम करणार आहेत. या संशोधकांचा विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठामध्ये संशोधन प्रकल्पांवर काम करण्याचा शिरस्ता पदार्थ विज्ञानाचे प्रा. एस.एच. पवार यांनी निर्माण केला. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी संशोधन विकासासाठी आवश्यक पर्यावरण आणि शिस्त निर्माण करून महत्त्वाचे बीजारोपण केले. त्याची फळे गेल्या दशकभरापासून आपणास मिळत आहेत. त्यानंतरच्या कालखंडात विविध विभागांतील अत्यंत वरिष्ठ संशोधकांनी विद्यापीठाचे नाव जगभरात उंचावले. मटेरियल सायन्समध्ये तर अद्भूत म्हणावे असे काम आपण केले. त्यामुळे आयआयएससीसोबत ॲडव्हान्स्ड मटेरियल सायन्सविषयक प्रकल्पावर काम करण्याची संधी आपल्या संशोधकांना मिळाली आहे. या संशोधकांना प्रकल्पासाठी आवश्यक ते पाठबळ उपलब्ध करण्यास विद्यापीठ तत्पर असेल.' मुख्य संशोधक डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. केशव राजापुरे, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. नलिनी तरवाळ, डॉ. सागर डेळेकर, डॉ. के.एम. गरडकर, डॉ. अनिल घुले, डॉ. एस.एन. तायडे, डॉ. डी.एस. भांगे, डॉ. जे.बी. यादव, डॉ. के.डी. पवार, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. कविता ओझा, डॉ. के.डी. कुचे, डॉ. एस.डी. पवार, डॉ. एस.एस. सुतार आणि डॉ. के.एस. खराडे या संशोधकांचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
27 APR 2025
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकांना उद्योग, व्यवसायाची संधी

## शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन




**कोल्हापूर : सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय पातळीवरील परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पी. एस. पाटील. सोबत संस्थेच्या सचिव शोभा तावडे, सुजय तावडे, डॉ. एम. एस. गणचारी, डॉ. हर्षा हेगडे, रवींद्र पुरोहित आदी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारत सरकारने विविध मंत्रालयांमार्फत संशोधन योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ विद्यापीठांसह शिक्षण संस्था आणि शास्त्रज्ञांना होणार आहे. तसेच सरकारच्या योजनांच्या माध्यमातून युवकांना उद्योग, व्यवसाय करण्याची संधी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

आर एल तावडे फाऊंडेशनचे, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर आणि 'असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल टीचर्स ऑफ इंडिया' महाराष्ट्र राज्य, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'इमर्जिंग ट्रेंड्स इन ड्रग डिस्कव्हरी अॅण्ड ट्रान्सलेशनल रिसर्च' हा या परिषदेचा विषय होता. या परिषदेद 'नॉवेल ड्रग डिलिव्हरी सिस्टिम', 'रेग्युलेटरी अफेअर्स', 'आर्टीफिशिअल इंटेलिजन्स' आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेच्या सचिव शोभा तावडे यांनी विद्यार्थ्यांना 'संशोधनाचे महत्व', 'संशोधनाच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. बेळगाव येथील केएलई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एम. एस. गणचारी यांनी 'औषध आणि संशोधन महत्त्व', बेळगावच्या डॉ. हर्षा हेगडे यांनी 'उपचार पद्धतीवर संशोधनाचे महत्त्व' तसेच पुण्यातील आरएन फार्मा कन्सल्टिंगचे संचालक रवींद्र पुरोहित यांनी 'संशोधन व विकास', 'बायोसिमिलर्स', 'औषध निर्मिती आणि डिजिटल हेल्थ' या विषयावर मार्गदर्शन केले. देशातील १२ राज्यातून ४१५ बी.फार्म, एम.फार्म, विद्यार्थी, प्राध्यापक तसेच पीएच. डी संशोधकांनी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी शोध निबंध व पोस्टर प्रेझेंटेशन केले. या स्पर्धकांमधील विजेते आणि उपविजेत्यांना डॉ. श्रीधर पाटील, दीपक जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आभार प्रा. सुजाता चौधरी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. निशिता वाणी यांनी केले. संस्थेचे सहसचिव सुजय तावडे यांचे परिषदेसाठी मार्गदर्शन लाभले. यावेळी जयसिंगपूर येथील जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील, कोल्हापुरातील केडीसीए इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ आर. डी हिरेमठ, पेठ वडगाव येथील वुमेन्स कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. धनराज जडगे, संचालक डॉ. अनिलकुमार कुलकर्णी, प्राचार्य डॉ. राजकुमार बगली आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2025
पुढारी

# मिरज महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास विद्यापीठाची मान्यता

**कोल्हापूर :** मिरज महाविद्यालय, मिरज यांना नावात बदल करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. याबाबतचे पत्र कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी संबंधित संस्थेला पाठवले आहे. यशवंत शिक्षण संस्था सांगली कुपवाड (ता. मिरज, जि. सांगली) यांनी संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासंदर्भात विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकार मंडळांने महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आता मिरज महाविद्यालय मिरज या मूळ नावाऐवजी लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज असे नाव प्रस्तावित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2025
तरुण भारत

# मिरज महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता

कोल्हापूर : मिरज महाविद्यालय, मिरज यांना नावात बदल करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांने मान्यता दिली आहे. याबाबतचे पत्र कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी संबंधित संस्थेला पाठवले आहे. यशवंत शिक्षण संस्था सांगली कुपवाड (ता. मिरज, जि. सांगली) यांनी संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासंदर्भात विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकार मंडळांने महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आता मिरज महाविद्यालय मिरज या मूळ नावाऐवजी लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज असे नाव प्रस्तावित करण्यात आले आहे.

- **आता लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज असे नाव**

27 APR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशात उच्च शिक्षण, ७५ पीएचडी विद्यार्थ्यांना संधी मिळणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

परदेशात उच्च शिक्षण पीएचडीसाठी २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत प्रतिवर्षी विज्ञान, अभियांत्रिकी व



शिवाजी विद्यापीठातून

विषय प्राधान्याने ७५ विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर पूर्व व पीएचडी अभ्यासक्रमासाठी संधी देण्यात येते. विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्यासाठी www. maharashtra. gov. in या शासकीय वेबसाईटवरून किंवा obcbahujankalyan. maharashtra. gov. in या संकेतस्थळावरून मार्गदर्शक सूचना, अटी, पात्रता, आवश्यक कागदपत्रांची माहिती मिळू शकते.

पाच विद्यार्थ्यांना विमान भाडे भरणे, इतरांना शिक्षण शुल्क व संशोधन खर्चासाठी अनुदान दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०२० नंतर परदेशी विद्यापीठात प्रवेश घेतलेले किंवा प्रवेश मिळालेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.

अर्जासोबत जातप्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्र, पासपोर्ट, प्रवेशपत्र, विद्यापीठाची ऑफर लेटर अशी सर्व माहिती अपलोड करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष

27 APR 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथील सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत मान्यवर.

# विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला संघ रवाना

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथे ३० एप्रिल ते ३ मे दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ आज रवाना झाला. या संघाच्या कर्णधारपदी स्वप्नाली वायदंडे हिची निवड झाली.

निवड झालेल्या संघात करिश्मा कुडचे, ऐश्वर्या पुरी, अंजली पवार, साक्षी येटाळे, मृणाल जाधव, वैष्णवी हुळहुळे, सृष्टी शिंदे, सौंशज्ञा माने, सागरिका म्हातो, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, अनुजा पाटील, श्रावणी चौगुले, निलोफर गौस, सृष्टी देशमुख यांचा समावेश आहे. संघ प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव, संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. राम पवार यांची निवड झाली. संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठाचा सॉफ्टबॉल महिलांचा संघ जाहीर

**कोल्हापूर :** नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथे दि. ३० एप्रिल ते ३ मे दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ शनिवारी रवाना झाला. स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर गेले दहा दिवस विशेष एकत्रित सराव शिबिर झाले. या संघात एकूण १६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला. निवडण्यात आलेल्या संघामध्ये स्वप्नाली वायदंडे (कर्णधार), करिष्मा कुडचे, ऐश्वर्या पुरी, अंजली पवार, साक्षी येटाळे, मृणाल जाधव, वैष्णवी हुळहुळे, सृष्टी शिंदे, सौंशज्ञा माने, सागरिका म्हातो, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, अनुजा पाटील, श्रावणी चौगुले, निलोफर गौस, सृष्टी देशमुख यांचा समावेश आहे, प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव, तर संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. राम पवार यांची निवड झाली. संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.